**प्रेस नोट**

अॅन्टी करप्शन ब्युरो,जळगांव
दि.२८.१२.२०२१

**आरोपी.मुश्ताक मोतेबार सैय्यद वय ३८, व्यवसाय– १०८ रुग्ण वाहिकावरील कंत्राटी डॉक्टर,रा.घाट रोड,चौधरी वाडा, चाळीसगांव जि.जळगांव यांना ६०,०००/–रु.लाचेची मागणी करुन ६०,०००/–रुपये लाचेची रक्कम स्वीकारंताना लाचलुचपत प्रतिबंध विभाग,जळगांव यांची कारवाई.**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | घटक | :– | जळगांव |
| २ | गुन्हा नोंद कंमाक | :– | चाळीसगांव शहर पो.स्टे., गु.र.नं.०४७३/२०२१ |
| ३ | कलम | :– | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चे कलम–७ प्रमाणे... |
| ४ | आरोपीचे नांव व कार्यालय | :– | मुश्ताक मोतेबार सैय्यद, वय–३८, व्यवसाय– १०८ रुग्ण वाहिकावरील कंत्राटी डॉक्टर, रा.घाट रोड, चौधरी वाडा, चाळीसगांव ता.चाळीसगांव जि.जळगांव . **(खाजगी व्यक्ती)** |
| ५ | मागणी केलेली लाचेची तारीख व रक्कम | :– | दि.२७.१२.२०२१<br>६०,०००/–रु. लाचेची मागणी |
| ६ | स्विकारलेली लाचेची रक्कम | :– | ६०,०००/–रु. |
| ७ | गुन्हा दाखल तारीख | :– | दि.२८/१२/२०२१ |
| ८ | थोडक्यात माहीती | :– | यातील फिर्यादी यांचे दोन ॲम्ब्युलन्स वाहने असुन सन २०२० मध्ये कोरोना आजाराचे काळात नमुद दोन्ही ॲम्ब्युलन्स वाहने हे ग्रामीण रुग्णालय,चाळीसगांव येथे भाडे तत्वावर लावण्यात आलेले होते. सदर एका ॲम्ब्युलन्स वाहनाचे १,५५,४४०/–रुपये व दुसऱ्या ॲम्ब्युलन्स वाहनाचे २,६६,५००/–रुपये असे दोन बिले फिर्यादी यांनी मंजुरीसाठी टाकले होते. सदर बिलांची पडताळणी होवुन सदर बिलांमध्ये त्रुट्या असल्याने सदरचे बिले मा.वैद्यकीय अधिक्षक,ग्रामीण रुग्णालय चाळीसगांव यांचेकडे परत आले होते व त्यांच्या कार्यालयात प्रलंबित होते. सदर बिलांबाबत फिर्यादी हे दि.२२/१२/२०२१ रोजी ग्रामीण रुग्णालय,चाळीसगांव येथे विचारपुस करण्यासाठी गेले असता सदर ठिकाणी आरोपी हे फिर्यादीस भेटले व तुमचे दोन ॲम्ब्युलन्सच्या बिलांच्या मंजुरीसाठी लागणारे पत्र मा.वैद्यकीय अधिक्षक, डॉ.मंदार करंबळकर, ग्रामीण रुग्णालय,चाळीसगांव यांच्याशी बोलणी करुन त्यांचेकडुन बिल मंजुरीसाठी लागणारे पत्र तयार करुन आणुन देतो असे सांगुन त्या मोबदल्यात डॉ.सैय्यद यांनी फिर्यादी यांचेकडे ६०,०००/–रुपये लाचेची मागणी केली बाबत फिर्यादी यांनी दि.२५/१२/२०२१ रोजी अॅन्टी करप्शन ब्युरो,जळगांव कार्यालयाकडे तक्रार दिली होती.<br>सदर तक्रारीची अॅन्टी करप्शन ब्युरो, जळगांव पथकाने पंच साक्षीदारासमक्ष दि.२७.१२.२०२१ रोजी पडताळणी केली असता यातील आरोपी यांनी फिर्यादी यांचेकडेस दोन्ही ॲम्ब्युलन्स वाहनांचे बिले मंजुरीसाठी लागणारे पत्र वैद्यकीय अधिक्षक, डॉ.मंदार करंबळकर यांचेकडुन तयार करुन आणुन देण्याच्या मोबदल्यात डॉ.सैय्यद यांनी भ्रष्ट व बेकायदेशीर मार्गाचा वापर करुन तसेच आपल्या वैयक्तीक प्रभावाचा वापर करुन डॉ.मंदार करंबळकर यांच्यासाठी फिर्यादी यांचेकडेस पंचासमक्ष ६०,०००/–रुपये लाचेची मागणी केली व सदरची लाचेची रक्कम आरोपी यांनी पंच साक्षीदारासमक्ष फिर्यादी यांचेकडुन स्वत: वर नमुद वेळी व ठिकाणी स्विकारली म्हणुन गुन्हा. |

लचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबधी काही माहीती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग जळगांव कार्यालयात संपर्क करावा.

**संपर्क पत्ता:**– अॅन्टी करप्शन ब्युरो कार्यालय,जळगांव जिल्हाधिकारी कार्यालय परिसर,अल्पबचत भवन बिल्डींग,जळगांव.
ईमेल आयडी:– dyspacbjalgaon@gmail.com
संकेतस्थळ:– acbmaharastra.gov.in
टोल फ्री कंमाक:– १०६४
दुरध्वनी कंमाक:– ०२५७–२२३५४७७
व्हॉटस्ॲप कंमाक:– ८७६६४१२५२९

पोलीस उप अधिक्षक अॅन्टी करप्शन ब्युरो जळगांव

२८.१२.२१

**शशिकांत श्रीराम पाटील**
**पोलीस उप अधिक्षक**
**अॅन्टी करप्शन ब्युरो,जळगांव**